महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९ अंतर्गत करावयाच्या कार्यवाहीबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक- एमपीआय १११९ /प्र.क्र. ०९/पोल-११
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०००३२.
दिनांक: २५ फेब्रुवारी, २०१९

: <u>परिपत्रक</u> :

ठेवीदारांची फसवणूक झाल्याप्रकरणी तक्रार प्राप्त झाल्यास अथवा अन्यथा दाखल करण्यात आलेल्या प्रकरणी भारतीय दंड विधान संहितेमधील संबंधीत कलमांबरोबरच महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात येतो. अशा गुन्ह्यांमध्ये आरोपींचे फौजदारी दायित्व (Criminal Liability) निश्चित होण्यासाठी फौजदारी कार्यवाहीबरोबरच अशा गुन्ह्यांमध्ये बाधीत झालेल्या बळीतांना, उक्त कायद्यातील तरतूदीनुसार, त्यांच्या ठेवी परत करण्याच्या दृष्टिने कालबध्द कार्यवाही होणे क्रमप्राप्त आहे. तद्नुषंगाने, अशा प्रकरणांमध्ये करावयाच्या कार्यवाहीबाबत सुसुत्रता व निश्चित कार्यपध्दती असणे आवश्यक असल्याने याबाबत सविस्तर सूचना याद्वारे निर्गमित करण्यात येत आहेत.

१. ठेवीदारांच्या फसवणूक प्रकरणी दाखल होणाऱ्या गुन्ह्यांमध्ये तक्रारदारांची संख्या ही मोठ्या प्रमाणावर असते. बहूतांश वेळी, फसवणूक झालेले सर्वच ठेवीदार हे तक्रार देण्यास पुढे येत नाहीत, असे निदर्शनास येते. यामुळे सुरुवातीस गुन्ह्याची व्याप्ती स्पष्ट होत नाही. म्हणून, सदर वित्तीय संस्थेने केलेल्या फसवणूकीबाबत करण्यात येत असलेल्या कार्यवाहीची माहिती ठेवीदारांना ज्ञात होण्यासाठी तसेच ठेवीदारांनी तक्रार देण्यास पुढे यावे याकरीता संबंधीत पोलीस घटक प्रमुख यांनी प्रमुख वर्तमानपत्रात जाहीर प्रकटन द्यावे. अशा गुन्ह्यांमध्ये बाधीत झालेल्या ठेविदारांकडून त्यांच्या ठेवीबाबत व अनुषंगीक आवश्यक असलेला तपशील सोबत जोडलेल्या **<u>"परिशिष्ट-१"</u>** मध्ये भरुन घेण्यात यावा. याद्वारे, एकूण ठेवीदारांची व त्यांच्या नुकसानीबाबतचा तपशिल प्राप्त करण्यास मदत होईल.

२. ज्या गुन्ह्यांमध्ये महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९ च्या तरतूदी लागू करण्यात येतात, अशा गुन्ह्यांमध्ये, बाधीत झालेल्या

बळीतांना त्यांच्या ठेवी परत करण्यासाठी संबंधीत वित्तीय संस्थेच्या मालमत्ता ह्या तातडीने जप्त करणे आवश्यक आहे. याकरीता, प्रथमत: संबंधीत वित्तीय संस्थेने गोळा केलेल्या ठेवीमधून स्वत:च्या नावाने किंवा कोणत्याही अन्य व्यक्तींच्या नावाने संपादन केला असल्याचा मानण्यात येणारा पैसा किंवा अन्य मालमत्ता जप्त करण्याची तरतूद आहे. तथापि, मालमत्ता किंवा पैसा जप्तीसाठी उपलब्ध नाही किंवा ठेवीची परत फेड करण्यासाठी पुरेशी नाही, असे दिसून आल्यास उक्त वित्तीय संस्थेचे प्रवर्तक, संचालक, भागीदार, व्यवस्थापक किंवा सदस्य यांच्या मालमत्ता (जंगम व स्थावर) जप्त करण्याची तरतूद उक्त कायद्यामध्ये आहे.

३. कायद्यातील उक्त तरतूदीस अनुसरुन कलम ४(१) अन्वये शासन अधिसूचनेसाठी आवश्यक प्रस्ताव संबंधीत पोलीस घटक प्रमुख (बृहन्मुंबई वगळून) यांनी सोबत जोडलेल्या **"परिशिष्ट २"** प्रमाणे पुर्तता करुन संबंधीत जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करावा व त्याची प्रत अपर पोलीस महासंचालक (आर्थिक गुन्हे), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना सादर करावी. अपर पोलीस महासंचालक (आर्थिक गुन्हे) यांनी असे प्रस्ताव तपासुन त्यांचे अभिप्रायासह शासनास तातडीने सादर करावेत.

बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रातील प्रस्ताव सोबत जोडलेल्या **"परिशिष्ट २"** प्रमाणे पुर्तता करुन प्रकरणपरत्वे, सह पोलीस आयुक्त (आर्थिक गुन्हे शाखा) व सह पोलीस आयुक्त (कायदा व सुव्यवस्था) यांनी आवश्यक तपासणी करुन त्यांच्या शिफारशींसह जिल्हाधिकारी यांच्या मार्फतीने शासनास सादर करावेत.

४. संबंधीत जिल्हाधिकारी यांनी असा प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर, सदरहू प्रस्ताव तपासून तसेच नियुक्त करावयाच्या सक्षम प्राधिकारीच्या तपशीलासह तो शासनास समर्थनीय शिफारशींसह १५ दिवसात सादर करावा.

५. शासन स्तरावर प्राप्त होणाऱ्या प्रस्तावावर शासन मान्यतेनंतर राजपत्रात अधिसूचना निर्गमित करण्यात येते. तद्नंतर, कायद्यातील कलम ५(३) प्रमाणे सक्षम प्राधिकाऱ्याकडून आवश्यक शपथपत्रासह विशेषीत न्यायालयामध्ये ३० दिवसात अर्ज करणे बंधनकारक आहे. ही कालमर्यादा लक्षात घेता तसेच, न्यायालयीन प्रक्रियेतील निकड लक्षात घेता सक्षम प्राधिकारी व आर्थिक गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांनी योग्य तो समन्वय सतत ठेवावा. याबाबत, संबंधीत पर्यवेक्षीय अधिकारी यांनी विशेष लक्ष पुरवावे.

६. **“परिशिष्ट १”** प्रमाणे ठेवीदारांच्या देय रक्कमांबाबत प्राप्त झालेली माहिती तसेच गुन्ह्यांमध्ये फॉरेन्सीक ऑडीट करण्यात आले असल्यास यामध्ये प्राप्त झालेली माहिती याबाबतची पुर्ण खातरजमा करुन, ठेवीदारांच्या देय रकमा मा. विशेषीत न्यायालयाच्या आदेशानुसार अदा करण्याची कार्यवाही सक्षम प्राधिकारी यांनी करावी. सक्षम प्राधिकारी यांना आवश्यक सर्वतोपरी सहकार्य आर्थिक गुन्हे शाखेतील अधिकारी यांनी द्यावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०२२५१६३२४८३९२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

YUVRAJ BAYAJI AJETRAO

Digitally signed by YUVRAJ BAYAJI AJETRAO
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=a34e563dd43e83b04db3eb31230d59c1af4b6e29ee6c1f13e338b0ccd51689af, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=c01c962d08bd39997d4c4d6e7e19f8acf340d1a5c4dd2b9a00977369607bbf82, ou=HOME DEPARTMENT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=YUVRAJ BAYAJI AJETRAO
Date: 2019.02.25 16:36:07 +05'30'

(युवराज.ब. अजेटराव)
उप सचिव, गृह विभाग,
महाराष्ट्र राज्य

प्रति,

१. अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
४. प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. अपर पोलीस महासंचालक, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे.
६. अपर पोलीस महासंचालक (आर्थिक गुन्हे), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७. सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरिक्षक.
८. सह पोलीस आयुक्त (कायदा व सुव्यवस्था), बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालय, मुंबई.
९. सह पोलीस आयुक्त, (आर्थिक गुन्हे शाखा), बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालय, मुंबई.
१०. सर्व जिल्हादंडाधिकारी.
११. सर्व पोलीस आयुक्त (बृहन्मुंबई वगळून) /सर्व पोलीस अधीक्षक.
१२. निवडनस्ती, कार्यासन (पोल ११, १२ व १३).

(शासन परिपत्रक क्रमांक- एमपीआय १११९/प्र.क्र.०९/पोल-११, दि.- २५ फेब्रुवारी , २०१९ चे सहपत्र)

परिशिष्ट १

ठेवीची परतफेड मिळण्यासाठी करावयाचा अर्जाचा नमुना

प्रति,
पोलीस आयुक्त/ पोलीस अधीक्षक

मी ...., ... या वित्तीय संस्थेत केलेल्या ठेवीच्या परतफेडसाठी अर्ज करीत आहे.
त्याबाबतचा तपशील खालील प्रमाणे आहे.

१. अर्जदार/ठेवीदाराचे नाव.
२. वडिलांचे/पतिचे/पालकाचे नाव.
३. व्यवसाय.
४. मोबाईल / दूरध्वनी क्रमांक (एस.टी.डी कोडसह).
५. ईमेल पत्ता (असल्यास)
६. पॅन क्रमांक (असल्यास, प्रत सोबत जोडावे)
७. अर्जदाराचा पत्ता

....
....

८. वित्तीय संस्थेबाबत तपशील
अ) वित्तीय संस्थेच्या वतीने अर्जदाराशी संपर्क करणारे व्यक्ती, मॅनेजर, एजंट, प्रतिनिधी ज्यांनी ठेवीसाठी अर्जदारास प्रवृत्त केले व अर्जदाराकडून रक्कम स्वीकारली आहे त्यांचे नाव,पत्ता, संपर्कासाठी उपलब्ध तपशील

९. ठेव योजनेबाबत अर्जदारास देण्यात आलेले माहितीपत्रक, प्रसार साहित्य, इ. (कागदपत्र उपलब्ध असल्यास सोबत जोडावे)
अ) ठेव योजनेबाबत दस्तावेज, ठेवीदारांसाठी मार्गदर्शक / प्रचार पत्रक
ब) ठेवीसाठी अर्जाचा नुमना
क) माहितीपत्रक, प्रसिध्दीपत्रक.
ड) ईमेल संदेश किंवा पत्रव्यवहार
इ) सादरीकरण
ई) अन्य कोणतेही ठेवीसाठी प्रचार साहित्य

१०. ठेवीसाठी अदा केलेल्या रक्कमेचे तपशील.

रक्कम अदा केल्याचे साधन$ तपशील#

i. ....
ii. ....
iii. ....
iv. ....

एकूण रक्कम ....

$ (रोख/चेक/डी.डी)

डी.डी साठी त्याचा क्रमांक, दिनांक, बँकेचा तपशील, व चेक साठी बँकेचे पासबुक किंवा बँक खात्याचे लेखा तपशील व प्रत जोडावी

#रक्कम रोखीने अदा केले असल्यास, पावती, बाँड, हमीपत्र इ. ची प्रत जोडावी

११. ठेवीदाराच्या बँकेचे तपशील

बँकेचे व शाखेचे तपशील	
खातेदाराचे नाव	
खाते क्रमांक	
खात्याचे प्रकार	बचत / चालू खाते (योग्य निवडावे)
IFSC कोड	

१२. वित्तीय संस्थेबाबत अर्जदाराने किंवा इतर ठेवीदारांनी इतर शासकीय यंत्रणेकडे (पोलीस, सेबी, कंपनी निबंधक, इ.) तक्रार केले असल्यास त्याबाबत तपशील

घोषणापत्र

मी/आम्ही____खाली स्वाक्षरी करणारे घोषणा करतो की वर दिलेली माहिती ही माझ्या/आमच्या माहिती प्रमाणे खरी व अचूक आहे. जर वर दिलेली माहिती खोटी आढळून आल्यास मी/आम्ही दिवाणी व फौजदारी कारवाईस पात्र राहू.

ठिकाण	:	
दिनांक	:	स्वाक्षरी /अंगठा

(शासन परिपत्रक क्रमांक- एमपीआय १११९/प्र.क्र.०९/पोल-११, दि.- २५ फेब्रुवारी, २०१९ चे सहपत्र)

<u>परिशिष्ट २</u>

एम.पी.आय.डी कायद्याखाली कलम ४ (१) अन्वये करावयाची कार्यवाहीसाठी आवश्यक कागदपत्र-

१. दाखल झालेल्या गुन्ह्याबाबत तपशील.
२. सदर प्रकरणी इतर ठिकाणी एम.पी.आय.डी कायद्याखाली याच व्यक्ती अथवा वित्तीय संस्थेवर गुन्हा दाखल झाला असल्यास त्याबाबत तपशील.
३. ज्या वित्तीय संस्थेने ठेवी घेतल्या त्याबाबत तपशील.
४. वित्तीय संस्थेचे प्रतिनिधी ज्यांनी ठेवीदारांना ठेवीसाठी प्रवृत्त केले आहे.
५. ठेवीदारांकडून प्राप्त तक्रारी अथवा परतावा मागणीचे अर्जांची संख्या.
६. प्राप्त तक्रारी अथवा परतावा मागणीचे अर्जांत गुंतलेली रक्कम.
७. प्रकरणी फॉरेन्सिक ऑडिट (forensic audit) करण्यात आले आहे काय, असल्यास अहवालाची प्रत सोबत जोडण्यात यावी.
८. वित्तीय संस्थेच्या मालमत्त्यांची संख्या (बँक खाते, बाँड, शेअर, मुदत ठेवी इत्यादी आर्थिक साधने, जंगम मालमत्ता, स्थावर मालमत्ता)
९. जर वित्तीय संस्थेकडे मालमत्ता नसल्यास किंवा ती ठेवीदारांना परतफेड करण्यासाठी अपुरी असल्यास, वित्तीय संस्थेचे प्रवर्तक, संचालक, भागीदार अथवा मॅनेजर अथवा सदस्य यांच्या मालमत्तेबाबत तपशीलः
   (अ) वित्तीय संस्थेच्या मालमत्तेबाबत तपशील.

   (ब) वित्तीय संस्थेचे प्रवर्तक, संचालक, भागीदार यांच्या मालमत्तेबाबत तपशील.

   (क) वित्तीय संस्थेच्या मॅनेजर यांच्या मालमत्तेबाबत तपशील.

   (ड) वित्तीय संस्थेचे सदस्य यांच्या मालमत्तेबाबत तपशील.

१०. कलम ४ (१) च्या अधिसूचनेसाठी आवश्यक कागदपत्रे

   (अ) बँक खात्यांबाबत तपशील

   (ब) बाँड, शेअर, मुदत ठेवी इत्यादी आर्थिक साधने बाबत तपशील

   (क) जंगम मालमत्ता बाबत तपशील

   (ड) स्थावर मालमत्ता बाबत खालील कागदपत्रासह तपशील

      १. अधिकार अभिलेख (७/१२ उतारा किंवा मालमत्ता पत्रक)

      २. नोंदणीकृत खरेदीखत किंवा इतर दस्तावेज

      ३. जप्त करावयाचे प्रस्तावित मालमत्तेवर इतर बोजे किंवा हितसंबंध

      ४. मालमत्तेचे अंदाजे मूल्यांकनासाठी चालू वर्षाचे शीघ्र सिध्द गणक (ready reckoner)